# —: प्रेस नोट :—

## गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम व नक्सल प्रभावित अतिसंवेदनशिल भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी येथील वर्ग १ चे वैद्यकीय अधिकारी यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरो गडचिरोलीची धाडसी कारवाई

प्राथमीक आरोग्य केंद्र, लाहेरी, ता. भामरागड, जिल्हा गडचिरोली येथील वैद्यकिय अधिकारी श्री. डॉ. संभाजी भोकरे, वय-३६ वर्षे, (वर्ग-१) यांना १,३०,०००/- रुपये लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने आज रोजी ताब्यात घेतले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील आरोपी डॉ. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमीक आरोग्य केंद्र, लाहेरी यांनी तक्रारदार यांस दि. ०३/०२/२०२५ व दि. २५/३/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता, आलोस डॉ. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी,(वर्ग-१) प्रा. आ. केंद्र, लाहेरी यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वत:चे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने, तक्रारदार यांचे प्राथमीक आरोग्य केंद्र लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी २०२४ ते सप्टेंबर २०२४ व नोव्हेंबर महिन्याचे १४ दिवसाचे रोखलेल्या पगाराचे पुरवणी बिलाकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे, त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता १,५०,०००/- रु. लाच रक्कमेची मागणी करुन पंचासमक्ष तडजोडीअंती १,३०,०००/- रु. ची सुस्पष्ट मागणी केली असल्यामुळे तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

सदरचा भाग हा नक्सलग्रस्त असुन तिथे नक्सलींचा कायम वावर असतो मात्र पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पो. नि. श्री. संतोष पाटिल, पो.नि. श्री. शिवाजी राठोड व टिम यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे प्रा. आ. केंद्र लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी २०२४ ते सप्टेंबर २०२४ व नोव्हेंबर महिन्याचे १४ दिवसाचे रोखलेल्या पगाराचे पुरवणी बिलाकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता १,५०,०००/- रु. लाच रक्कमेची मागणी करून पंचासमक्ष तडजोडीअंती १,३०,०००/- रु. ची सुस्पष्ट मागणी केली केल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे, गडचिरोली, जिल्हा-गडचिरोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर दुर्गम व नक्सलप्रभावित भागात ला.प्र.वि.गडचिरोलीच वर नमुद टिमने अत्यंत धाडसी कारवाई करून सदर वैद्यकीय अधिकारी यांस ताब्यात घेवुन अटक करून पुढिल कारवाई केली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. दिगंबर प्रधान, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांचे पर्यवेक्षणात पो. नि. संतोष पाटिल, पो.नि. शिवाजी राठोड, सफौ/ सुनिल पेद्दिवार, पोहवा/ राजेश पदमगिरीवार, पोहवा/ किशोर जौजांरकर, पोहवा/ स्वप्नील बांबोळ पो.अं. संदीप उडान, संदिप घोरमोडे, प्रविण जुमनाके, हितेश जेट्टीवार, मपोशि/ विद्या म्हशाखेत्री, मपोशि/ज्योत्सना वसाके व चापोहवा/ राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे. पुढिल तपास पोनि श्री. संतोष पाटील हे करीत आहेत.

सदर कारवाईचे अनुषंगाने ला.प्र.वि. गडचिरोली यांचेकडुन सामान्य जनतेस लाच मागणी संदर्भाने दिलासा देणेकरीता ते कोठेही पोहोचु शकत असल्याचा दिलासा देणारी कारवाई असुन लाचखोरांस दुर्गम व नक्सलग्रस्त भागाचा फायदा घेवुन सामान्य जनतेस पिळवणुकीपासुन रोखण्याचा व त्यांचेवर कारवाई करण्याचा संदेश या कारवाईतुन देणेत आलेला असुन गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप-अधीक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांनी केले आहे.

पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली
दुरध्वनी क्रमांक - ०७१३२-२९५०२०
टोल फ्रि क्रमांक - १०६४

(चंद्रशेखर पी.ढोले)
पोलीस उप-अधीक्षक
ला.प्र.वि गडचिरोली